# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 27 March 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २७ मार्च २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध–केंद्रीय कृषीमंत्र्यांचं प्रतिपादन
- विमान तिकीट दर नियंत्रित करण्यासाठी केंद्राची राज्यांना इंधन व्हॅट कपातीची सूचना
- विवाहपूर्व समुपदेशनासाठी देशातल्या ११ राज्यांमध्ये आतापर्यंत २३ केंद्रांची उभारणी

आणि

- महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवच्च्या नऊ सदस्य निवडणुकीसाठी येत्या तीन एप्रिल रोजी निवडणूक

****

शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत कृषी भवन इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. तूर, मसूर आणि उडदाचं जेवढं उत्पादन होईल ते सर्व किमान हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला आहे. याकरता शेतकऱ्यांना नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागेल, असं चौहान यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना तूर, मसूर आणि उडदाचा योग्य भाव मिळावा याकरता राज्यसरकारांनी प्रभावी आणि पारदर्शी खरेदी पद्धत राबवावी असं आवाहन त्यांनी केलं.

केंद्रसरकारने चालू रबी हंगामात ३७ लाख ३९ हजार टन कडधान्यांच्या तर २८ लाख २८ हजार टन मोहरीच्या खरेदीला मान्यता दिली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. खरीपातली तूर खरेदी २ लाख ४६ हजार टन पर्यंत झाली असून त्याचा फायदा १ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमधे हमीभावाने खरेदी सुरू आहे. येत्या चार वर्षात या अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करण्याचं उद्दिष्ट अर्थसंकल्पात निश्चित करण्यात आलं आहे.

****

देशातल्या प्रसारमाध्यम आणि मनोरंजन क्षेत्राने २०२४ मध्ये सुमारे अडीच हजार अब्ज रुपयांची उलाढाल केली, तर जाहिरातीतून मिळणारा महसूल ८ पूर्णांक १ दशांश टक्क्यांनी वाढला आहे. फिक्की आणि अर्न्स्ट अँड यंग या संस्थांनी सर्वेक्षण करून प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती दिली आहे. मुंबईत आज एका कार्यक्रमात हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. जाहीर कार्यक्रमांच्या थेट प्रसारणात १५ टक्के वाढ झाली तर दूरचित्रवाहिनी, चित्रपट, मुद्रित माध्यमं आणि ऑनलाईन गेमिंगचे ग्राहक २ टक्क्यांनी कमी झाले असं या अहवालात म्हटलं आहे. चालू वर्षात या क्षेत्रात ७ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ होईल असा अंदाज व्यक्त केला आहे.

****

देशातील विमान तिकिटांच्या किमती नियंत्रित करण्यासाठी केंद्राने राज्यांना एव्हिएशन टर्बाइन इंधनावरील व्हॅट कमी करण्याची सूचना नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी केली आहे. आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका उत्तरात त्यांनी ही माहिती दिली. विमान भाड्याच्या ४५ टक्के खर्च एटीएफमुळे होतो, काही राज्यं या इंधनावर २९ टक्के मूल्यवर्धित कर आकारत आहेत. तर काही राज्यांनी एटीएफवरील व्हॅट पाच टक्क्यांपेक्षा कमी केला आहे, विमान भाडे गतिमान आहे आणि ते मागणीवर आधारित आहे असल्याचं नायडू यांनी स्पष्ट केलं.

****

पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या पुणे–छत्रपती संभाजीनगर महामार्गासाठी नवी ग्रीन अलाइनमेंट तयार केली जात आहे. केंद्रीय मंत्री नितीन

गडकरी यांनी आज लोकसभेत ही माहिती दिली. यासाठी १५ हजार कोटी रुपयांची भव्य गुंतवणूक केली जात असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.यामुळे पुणे–संभाजीनगर अंतर फक्त २ तासांत पूर्ण होईल अशी माहिती गडकरी यांनी दिली.

****

चहा निर्यात करणाऱ्या देशांच्या यादीत भारताने दुसरा क्रमांक पटकावला आहे. भारतीय चहा बोर्डाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षभरात भारताने २५ कोटी ५० लाख टन चहाची निर्यात केली, जो गेल्या १० वर्षातला उच्चांक आहे. या निर्यात वाढीमुळे भारताने श्रीलंकेला मागं टाकलं असून एकूण निर्यातीत भारताचा वाटा १० टक्के झाला आहे. पहिल्या स्थानावर केनिया आहे. जगातल्या २५ देशांमधे भारतातून चहा निर्यात केला जातो. त्यात संयुक्त अरब अमिरात, इराक, इराण, रशिया, अमेरिका आणि इंग्लंड हे महत्त्वाचे खरेदीदार आहेत. भारतातला आसाम, दार्जिलिंग आणि नीलगिरीत पिकणारा चहा जगातल्या सर्वोच्च दर्जात गणला जातो.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरुद्धचा हक्कभंग प्रस्ताव राज्यसभेचे सभापती अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आज फेटाळून लावला. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्याविरुद्ध कथित अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी या प्रस्तावाची नोटीस दिली होती. २५ मार्च रोजी राज्यसभेत आपत्ती व्यवस्थापन विधेयकावर बोलताना शहा यांनी हे विधान केलं होतं, मात्र या विधानात आपल्याला मर्यादांचं उल्लंघन आढळलं नाही असं धनखड यांनी सांगितलं. सभापती जगदीप धनखड यांनी सदस्यांच्या वर्तनासाठी नवे मार्गदर्शन तत्वं जारी करण्याची सूचना इथिक्स कमिटीला केली आहे.

****

१०० दिवसात विविध कामं करण्याचा संकल्प राज्यसरकारने केला होता, मात्र त्यापैकी एकही संकल्प पूर्ण करण्यात आलेला नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. अस्वस्थ सरकारचं निरर्थक अर्थसंकल्पीय अधिवेशन होतं, अपयश लपवणारं हे अधिवेशन होतं, अशी टीका ठाकरे यांनी केली.

****

विवाहपूर्व समुपदेशनासाठी देशातल्या ११ राज्यांमध्ये आतापर्यंत २३ केंद्र उभारण्यात आली आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी ही माहिती दिली. अशी समुपदेशन केंद्र सरकारी कार्यालयांमध्ये उघडण्यात येतील, त्यांच्यावर जिल्हा प्रशासन किंवा पालिकांची देखरेख राहील. विवाहासंबंधी सामाजिक मानसशास्त्र आणि वर्तनाचे पैलू यांच्याविषयी विवाहेच्छुक मुलामुलींना समुपदेशन या केंद्रात देण्यात येईल. संयुक्त कुटुंब पद्धती लोप पावत असून, लहान कुटुंब निर्माण होत आहेत, त्यामुळे वैवाहिक तंटे, घटस्फोट, अपयशी विवाहांची प्रकरणं वाढत असल्याचं निरीक्षणही रहाटकर यांनी नोंदवलं.

****

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर एकूण नऊ सदस्य निवडणुकीसाठी पुढच्या गुरुवारी तीन एप्रिल रोजी निवडणूक घेण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होईल. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत नोंदणी झालेले तसंच नोंदणीचे नूतनीकरण केलेले जिल्ह्यातले चार हजार ३५२ मतदार या निवडणुकीमध्ये मतदानाला पात्र आहेत. प्रत्येक मतदारांला नऊ मतं देण्याचा अधिकार आहे.

****

लातूर महानगरपालिकेचा २०२५-२६ या वर्षासाठीचं १७ लाख रुपये शिलकीचं अंदाजपत्रक आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी आज सादर केलं. आगामी वर्षासाठी १ हजार ६४ कोटी ०७ लाख रुपये अपेक्षित जमा होणार असून ०१ हजार ६३ कोटी ९० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. करवाढ नसलेले हे अंदाजपत्रक आहे. आयुक्त बाबासाहेब मनोहर यांनी याबाबत अधिक माहिती दिली.

**बाईट – आयुक्त बाबासाहेब मनोहर**

****

'चला जाणू या नदीला' या उपक्रमांतर्गत उद्या बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील विडा इथं बोबाटी नदी संवाद परिक्रमेचं उद्घाटन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते होणार आहे. राज्यातील नद्या अमृतवाहिनी करण्याचा संकल्प या उपक्रमात करण्यात आला आहे.

****

गाळ मुक्त धरण गाळ युक्त शिवार योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात भोकर इथं सुधा प्रकल्पातील गाळ काढण्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते आज करण्यात आला. हा गाळ काढल्यामुळे या प्रकल्पातील पाण्याचा साठा वाढून सभोवतलाच्या शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना हा गाळ विनामूल्य उपलब्ध होणार आहे, शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असं आवाहन राहुल कर्डिले यांनी केलं आहे.
नारवट इथल्या वन विभागाच्या तळ्यातील गाळ काढण्याचे कामही हाती घेण्यात आलं आहे. श्रमदानातून ही गाळमुक्त मोहीम राबवण्यात येणार आहे.

****

कर्णबधीरांच्या सर्व शाळांमध्ये सांकेतिक भाषेची एकवाक्यता आणि समानता यावी दृष्टीकोनातून अलियावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्था मुंबई यांच्या सहकार्याने दिनांक तीन दिवसीय प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले आहेत. या वर्गात प्रशिक्षण घेतलेले शिक्षक, त्यांच्या शाळेतल्या इतर शिक्षकांना प्रशिक्षण देणार आहेत. समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त कार्यालयातंर्गत हिंगोली, लातूर, नांदेड, आणि धाराशिव या चार जिल्ह्यांतल्या ४७ कर्णबधिर विद्यालयांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

****

धुळे जिल्ह्यातील हाडाखेड शिवारात कंटेनरसह जवळपास ६७ लाख ५६ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. मध्यप्रदेशातील सेंधवा इथून हा गुटखा धुळे शहराकडे आणला जात होता अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

****

नाशिक जिल्ह्यातल्या कळवण तालुक्यामध्ये बांगलादेशी शेतकऱ्यांनी शेतकरी पीक विम्याचा लाभ घेतल्याची घटना समोर आल्यानंतर या प्रकरणी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यामध्ये १८१ बोगस शेतकऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. शासनाची दोन कोटी ९८ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यात पाटोदा पंचायत समितीमध्ये कार्यालयीन कामाविषयीच्या तक्रारींविरुद्ध आज आंदोलन करण्यात आलं. लाचखोरीचा आरोप करत, शेतकऱ्यांनी ५० लाख रुपयांच्या खोट्या नोटा उधळत आंदोलन केलं. चुंबळी

येथील ग्रामपंचायत मध्ये सदस्यांना विचारात न घेता कामे केली जात असून याबाबत पंचायत समितीकडे तक्रार करूनही त्याची दखल न घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलकांनी यावेळी केला.

****